# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

रेल्वे स्टेशन रोड, नांदेड - ४३१६०१

dyceogadzpnanded@gmail.com दुरध्वनी : ०२४६२ - २३४६६८.


जा.क्रं.जिपनां/साप्रवि/आस्था-२ब/5193/२०२४

दिनांक :30/१०/२०२४

प्रति,

१. मा.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा.नांदेड
२. सर्व खाते प्रमुख,जिल्हा परिषद,नांदेड
३. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती,जिल्हा नांदेड
४. सर्व बाल विकास अधिकारी एकात्मीक बाल विकास सेवा योजना ,जिल्हा नांदेड.
५. सर्व गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जिल्हा नांदेड (मार्फत सर्व जि.प.हा.)
६. सर्व उप विभागीय अभियंता, उप विभाग (बांधकाम/लघुपाटबंधारे/पाणी पुरवठा) जिल्हा परिषद,नांदेड
७. सर्व तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,नांदेड
८. सर्व वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केद्रं जिल्हा नांदेड (मार्फत ता.आ.अ)
९. सर्व मुख्याध्यापक ,जिल्हा परिषद हायस्कुल जिल्हा नांदेड (मार्फत गशिअ )

**विषय** :- जिल्हा सेवा वर्ग-३ वरिष्ठ सहाय्यक या संवर्गाची दि.०१/०१/२०२४ रोजीची अंतिम सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

**संदर्भ** : १. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही/२०११/ प्र.क्र. २८४/१२, दिनांक २१/१०/२०११.

२. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र.सेवाजे-२००८/प्र.क्र.३९/ आस्था-१० दिनांक ३१ मार्च २०१७.

३. मा.मु.का.अ.यांचे अधिकार प्रदान आदेश जा.क्र.जिपना/साप्रवि/आस्था-१/७ दि.३/११/२००७

४. या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.जिपनां/साप्रवि/आस्था-२ब/१९४२/२०२४ दिनांक २८/०३/२०२४

उपरोक्त विषयान्वये संदर्भ क्र.०१ शासन निर्णयान्वये शासन सेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता यादी प्रत्येक वर्षी तयार करणे व प्रसध्दि करणे याबाबत सर्वंकष धोरण विहित करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा सेवा गट-क वर्ग-३ **वरिष्ठ सहायक** या संवर्गाची प्राथमिक सेवा ज्येष्ठता यादी या कार्यालयाचे दिनांक २८/०३/२०२४ रोजीच्या संदर्भ क्र.०४ वरील पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच दिनांक ०१/०१/२०२४ रोजीच्या प्राथमिक सेवा ज्येष्ठता यादीवर आणि दिनांक ०१/०१/२०२३ रोजीच्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीवर संबंधित संवर्गातील कर्मचाऱ्यांचे आक्षेप व हरकती असल्यास सदर यादी प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्याबाबत

आणि मुदतीनंतर आलेले आक्षेप व हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची गांभीर्याने नोंद घेण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

सदरील सेवा ज्येष्ठता यादीवर प्राप्त झालेल्या आक्षेप व हरकतींचा विचार करुन संदर्भ क्र.०३ नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद नांदेड जिल्हा सेवा गट-क वर्ग-३ **वरिष्ठ सहायक** या संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२४ रोजीची सेवा ज्येष्ठता यादी अंतिम करण्यात येऊन यापत्रकासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी सदर सेवा ज्येष्ठता यादी आपल्या अधिनस्त संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन त्यांची स्वाक्षरी घेवून पोहोच आपल्या दप्तरी ठेवणेत यावी.

**सोबत :** अंतिम सेवा ज्येष्ठता यादी ०१/०१/२०२४

( राजकुमार मुक्कावार )
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
जिल्हा परिषद **नांदेड**